Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education,
Kolhapur Divisional Board, Kolhapur - 416004
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६००४.
Phones : Chairman 2690829 Secretary 2691405 PBX-2696101,2696102,2696103 FAX:[0231]2690758
E-Mail: divsec.kop@gmail.com Web : sscboardkolhapur.in

**परीक्षा महत्वाचे**

क्र.कोविमं/उ.मा./परीक्षा/ 762
दिनांक:-21/06/2022.

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा/ सांगली/ कोल्हापूर.

**विषय:-** **उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा जुलै-ऑगस्ट 2022 साठी आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रिलिस्ट, चलन व एक्सेल यादी जिल्हा वितरण केंद्रावर दि 29/6/2022 रोजी जमा करणेबाबत**

**संदर्भ:-** 1. राज्य मंडळ पत्र क्र.रा.मं./परीक्षा-3/2780 दि.08/06/2022
2. क्र.कोविमं/उ.मा. परीक्षा/625/दिनांक09/06/2022 चे परिपत्रक.
3. क्र.कोविमं/उ.मा. परीक्षा/627/दिनांक 09/06/2022 चे परिपत्रक.
4. क्र.कोविमं/उ.मा. परीक्षा/636/दिनांक 10/06/2022 चे परिपत्रक.
5. जा.क्र कोविम/12वी परीक्षा/696 दि. 16/6/2022 चे परिपत्रक.

उपरोक्त विषयांस अनुसरुन सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) जुलै-ऑगस्ट 2022 परीक्षेकरीता ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरण्याबाबत संदर्भ क्र.4 नुसार मुदतवाढीबाबत यापूर्वी कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार निर्धारित मुदतीत नियमित व विलंब शुल्कासह ऑनलाईन आवेदन पत्रे भरलेल्या सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क दि.27 ते 28/6/2022 रोजी बँकेत भरणा केलेल्या चलनासह विद्यार्थ्यांची प्रिलिस्ट यादी इत्यादी यापूर्वी संदर्भ क्रमांक 5 नुसार दिलेल्या विविध महत्वाच्या सूचनानुसार आवश्यक कार्यवाही करुन, परिपूर्ण साहित्य **(दि.22/6/2022 ऐवजी)** **बुधवार दि 29/6/2022** रोजी आपल्याअधिनस्त असलेल्या संबंधित वितरण केंद्रावर वितरण प्रतिनिधीकडे जमा करावयाची आहे. **सदर साहित्य कोणत्याही परिस्थितीत पोस्टाने पाठविण्यात येऊ नये याची गांभीर्याने नोंद घेण्यात यावी.**

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी ) जुलै-ऑगस्ट 2022 परीक्षेकरीता निर्धारित मुदतीत नियमित व विलंब शुल्कासह ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या प्रिलिस्ट, चलने आणि एक्सेल यादी तसेच सर्व पुनर्परीक्षार्थी (Repeater), श्रेणीसुधार (Class Improvement) आणि तुरळक विषय घेऊन (Isolated) ऑनलाईन पध्दतीने आवेदन पत्र भरलेल्या विद्यार्थ्यांच्या यापूर्वीच्या परीक्षेच्या गुणपत्रिकांची छायाप्रत संदर्भ क्रमांक 5 च्या परिपत्रकेतील महत्वाच्या सूचनांनुसार आवेदन पत्रासोबत सादर करणे बंधनकारक आहे याची नोंद घ्यावी. सदर विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेच्या छायाप्रती सोबत सादर न केल्यास प्रिलिस्ट स्विकारल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

तसेच **ज्या विद्यार्थ्यांच्या प्रिलिस्ट मध्ये दुरुस्त्या करावयाच्या आहेत अशा दुरुस्त्या असलेल्या प्रिलिस्टची प्राचार्यांनी प्रमाणित केलेली पाने स्वतंत्र पाकिटामध्ये भरुन वितरण केंद्रावर जमा कराव्यात. (पाकिटावर प्रिलिस्ट दुरुस्ती आणि कनिष्ठ महाविद्यालय क्रमांक लिहावा.) दुरुस्त्या असलेल्या प्रिलिस्टची पाने स्वतंत्र पाकिटामध्ये न जमा केल्यास सदर दुरुस्त्या केल्या जाणार नाहीत**, याची नोंद घ्यावी.

**(दत्तात्रय शंकर पोवार)**
प्र.विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**वितरण केंद्र प्रतिनिधींना सुचना:-**

सर्व जिल्हा वितरण केंद्र प्रतिनिधींना कळविण्यात येते की, वरील सूचनेनुसार उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) जुलै-ऑगस्ट 2022 परीक्षेकरीता नियमित व विलंब शुल्कासह ऑनलाईन आवेदनपत्र भरलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रिलिस्ट, चलने आणि एक्सेल यादी तसेच पुनर्परीक्षार्थी, श्रेणीसुधार व तूरळक विषय घेऊन प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची यापुर्वीच्या परीक्षेच्या गुणपत्रिकांची छायाप्रत, प्रिलिस्ट दुरुस्ती पाकिटे संबंधित क.महाविद्यालयाकडून जमा करुन घ्यावेत आणि कनिष्ठ महाविद्यालय सांकेतिक क्रमांक निहाय गठ्ठे करुन घेवून मंडळ कार्यालयात **गुरुवार दि 30/06/2022** रोजी संबंधित जिल्हा लिपिकांना देण्यात यावीत. वितरण केंद्रावर स्विकारण्यात आलेले सर्व साहित्य मंडळात दिले आहे याची खात्री करावी. **परीक्षा प्राधान्य असल्यामुळे दिलेल्या निर्धारित मुदतीतच साहित्य जमा करण्यात यावे.**

**प्रत महितीस्तव:-**

१) मा.शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग,कोल्हापूर.
२) शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सातारा, सांगली, कोल्हापूर.